# अलेक्झांडरचे पलायन

अरूण निगुडकर

अलेक्झांडरवर मी लिहिण्यास का प्रवृत्त झालो ? डिस्कव्हरी चॅनेलनं २००३ च्या दरम्यान अलेक्झांडरवर प्रत्येकी एक तासाच्या दोन सीडीज दाखवल्या. स्कॉटलंड यार्डच्या ठसेतज्ज्ञ प्रमुख कमांडर जॉन ग्रीव्ह यानं अलेक्झॉड्रिया (इजिप्त) शहरातील अलेक्झांडरची खरी कबर व थडगे त्या सुमारास शोधून काढले. त्याचं अथपासून इतीपर्यंतचे चित्रण त्या संशोधनात झाले. सर्व अत्याधुनिक उपकरणांचा उपयोग केला गेला. अलेक्झांडरने जिथे जिथे वास्तव्य झाले (इसवी सनपूर्व ३३६ राज्याभिषेक ते एप्रिल इसवी सनपूर्व ३२३ मृत्यू) त्या घटना, प्रसंग, स्थळे यांचे छायाचित्रण, इतिहास नोंदी, म्युझियम रेकॉर्ड ग्रीव्हने काटेकोरपणे गोळा केले. तज्ज्ञांना ते दाखवून खात्री करून घेतली.

हे सर्व करत असताना ग्रीव्हच्या असं लक्षात आलं, की ग्रीक इतिहास व नोंदीमध्ये त्रुटी आहेत, कल्पनाविलास आहे. त्यांच्या त्यांच्यातही एकवाक्यता नाही. विशेषतः ग्रीक इतिहासातील सर्व घटना अलेक्झांडरच्या पराक्रमाकडेच जाणाऱ्या आहेत. तो सुमारे छत्तीस ते चाळीस लढाया लढला त्याचा एकदाही कुठे पराभव झालेला या ग्रीक इतिहासकारांना आढळला नाही. हे इतिहासकारही अलेक्झांडरच्या समकालीन नसल्याने त्यांची जे काही लिहिले त्यात अनावश्यक भर पडत गेली. रामायण, महाभारत, पुराणे यात अशीच भर उत्तरोत्तर पडत गेली. जुलमी राजाच्या वंशपरंपरागत कारभारात जगात सर्वत्र असेच घडत आले आहे. त्यामुळे अलेक्झांडरचा इतिहास जाणून जे काही आम्ही शाळा-कॉलेजातून वाचत वा शिकत आलो त्यात अलेक्झांडरचे एकीकडे उदात्तीकरण करत असता, त्याच्या बोलण्या-वागण्यात, व्यसनांत त्याचे वर्णन करण्यास ग्रीक वा इतर परकीय कथाकारांना आपण काही चूक करतो असं वाटलंच नाही.

अलेक्झांडरचा भारताशी आलेला संबंध हा फक्त अठरा ते वीस महिन्यांचा आहे. प्लूटाचेचं म्हणणं खरं मानलं तर भारतावर चाल करून आलेल्या ग्रीक सैन्याची संख्या १लाख २० हजार सैन्य व पंधरा हजार घोडदळ इतकी प्रचंड होती. त्याच्या समोर लढाईला उभे राहिलेल्या भारतीय सैन्याची त्या त्या टोळी राज्यांची संख्या पाचशे ते हजार अशी असताना अलेक्झांडर इथे वा अन्यत्र विजयी होणे क्रमप्राप्तच होते. परंतु ग्रीक म्हणतात तसं ते झालं नाही.

कमांडर ग्रीव्हने त्याचे थडगे पूर्णपणे उघडून त्याच्या कवटी व सांगाडयाचे पूर्ण त्रिमिती चित्रण करून घेतले. त्यात त्याला अलेक्झांडरला कपाळावर, छातीवर व पायांवर झालेल्या जखमांचे व्रण एक्स-रे परीक्षणात अस्थिपंजरावर आढळले. पुरूबरोबर झालेल्या लढाईत त्याचा विजय झाला नाही हे सांगणाऱ्या अनेक घटना आहेत. त्या मी अनुक्रमाने नंतर देईन, परंतु मला कमांडर जॉन ग्रीव्हच्या संशोधनामुळे अलेक्झांडरची हालत उत्तरोत्तर कशी खराब होत गेली हे जाणून घेण्याची उत्सुकता वाढत गेली. एकिकडे मी अलेक्झांडरच्या भारतावरील आक्रमणावर जी माहिती मिळेल ती संकलित करत गेलो व दुसरीकडे ग्रीक रेकार्डमध्ये जॉन ग्रीव्हला आढळलेल्या त्रुटी शोधत गेलो. एरियन, प्लूटार्च, डिओडोरस, स्ट्रॅबो, कर्टीस (यस) यांच्यावरून बेतलेली प्राचीन ऐतिहासिक वर्णने खरी कशावरून ?

गांधार हे भारतातलं दुसऱ्या क्रमांकाचे सुसंपन्न विज्ञान, व्यापार, वैभव, दळणवळण, शिक्षण अशा सर्व क्षेत्रातलं मगधानंतरचं महत्वाचं राज्य, इसवी सनपूर्व सहाव्या शतकापासून प्रसिध्द. सम्राट अंभी यांच्याबद्दल प्रजेची भावना आदराची राहिली होती. अफगाणिस्तानातल्या कंधार वा काबूल नदी ते झेलमच्या दक्षिण किनाऱ्यापासून पुरू या महाभारतकालीन पुरूरव्याच्या वंशातील राजा यांचे नातेसंबंध होते.(ग्रीक नोंद)

ग्रीकांनी या राजाचं वैर असल्याची खोटी नोंद इतिहासात घुसडली आहे. कुठलाही सुसंपन्न राज्याचा राजा दहा-बारा हजार मैल दूर वसलेल्या परकीय सम्राटाला का इथे स्वतःहून का बोलवील?
बरं अलेक्झांडरचं वारेमाप चित्रण करणाऱ्या ग्रीकांनी त्यांच्या व्यसनी चारित्रहीन, आपमतलबी, बेभरवशाचा अशी दूषणेही दिलेली आहेत. कमांडर ग्रीव्हनं अलेक्झांडरचं केलेलं वैज्ञानिक विश्लेषण ग्रीकांची ही नोंद खरी मानते कारण ते पुराव्यानिशी सिध्द झालं आहे.

अलेक्झांडरचा भारतातील वास्तव्याचा काळ एकोणीस ते वीस महिन्यांहून जास्त नाही. पुरू व अलेक्झांडरची युध्दभूमी १८४८ साली जनरल ॲबटने युध्दतज्ज्ञ या नात्याने पारखून घेतली. त्यानं भौगोलिकदृष्टया त्या भूमीचं केलेलं वर्णन हे जबलपूरच्या भेडा घाटाप्रमाणे गारगोटीचं रणमैदान ;फनंतज्ञ च्सजमंनद्ध व प्रतापगडच्या सानिध्यातील जावळीच्या प्रदेशासारखे दोन ते तीन टेकडयांनी सुरक्षित वसलेला प्रदेश आहे. प्लुटार्च, कर्टीस, एरियन या ग्रीक इतिहासकारांचे पूर, पाऊस, वारे, पाणलोट, फुगवटे चौदा ते तीस फुटांचे पाण्याच्या वेगाने निर्माण झालेले भोवरे याचे वर्णन जनरल ॲबरला (१८४८) भौगोलिक परीक्षणात खरे असल्याचे लक्षात आले. पाकिस्तानच्या इरिगेशन व हवामान खात्याच्या परीक्षणात (१९६०) हीच परिस्थिती आढळली होती.

या परीक्षणांनी मला हे सांगितले, की गेल्या २२३५ वर्षाच्या काळात झेलमला-मे-जून-जुलै या काळात जे पूर येतात ते आजूबाजूचे प्रदेशात ठराविक हाहाःकार घडवतात. या काळात इथे युध्द झालेच तर आक्रमकाला भयंकर नुकसान सोसून पळावे लागेल. पुरूला वा अंभीला ही भौगोलिक परिस्थिती ठाऊक होती. अलेक्झांडर फेब्रुवारीत (इसवी सनपर्वू ३२६) तक्षशिलेत आला ही युध्दभूमी चार दिवसाच्या टप्प्यावर (शंभर मैल) असतानाही युध्द जुलै इसवी सनपूर्व ३२६ मध्ये झाले म्हणजे भारतीय सम्राटानी ते मुद्दाम घडवून आणले. म्हणजे सम्राट वा राजपुत्र अंभीने पुरूला सर्वतोपरी मदत केली.

अशा कमीत कमी पंचवीस घटना फक्त अठरा महिन्यात घडल्या आहेत, ज्यांचा आपण नीट अभ्यास केल्यावर आपण एकाच निष्कर्षावर येतो-अलेक्झांडर केवळ दैव बलवत्तर म्हणून बॅबिलोनला कसाबसा जीवानिशी सुखरूप पोहचला व केवळ दीड ते दोन महिन्यात मृत्यू पावला. हा काळही साधारण दोन वर्षाचाच आहे. त्याला झालेले शारिरीक, मानसिक नुकसान जगातील कुठल्याही सम्राटाच्या वाटयाला आले नाही.

मला आलेक्झांडर या व्यक्तिमत्वाबद्दल व्यक्तीशः राग-लोभ नाही. तो खरोखरीच विजयी झाला असता वा जगज्जेता झाला असता तर त्याला डोक्यावर घ्यायला माझी हरकत नव्हती. परंतु भारताच्या त्याच्या अठरा महिन्यांच्या वास्तव्यात ज्या ज्या घटना घडल्या त्याचे मला झालेले वास्तव दर्शन ग्रीक, ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन इतिहासकारांनाही झाले. त्यांच्या नोंदीत याचे उल्लेख कुठे आढळतात, कुठे नाहीत. जिथे आढळले त्यांचा खरेपणा मी जाणून घेतला. जिथे तसा संदर्भ मिळाला नाही तिथे वैज्ञानिक परीक्षणांवरून मी माझे निष्कर्ष काढले. अशा प्रसंगांची फक्त जंत्री मी इथे देतो कारण ते माझ्या लिखाणात विस्ताराने नंतर येणार आहेत.

१) ग्रीक इतिहासकारांना अलेक्झांडर भारतात नक्की का आला हे शोधता आलेले नाही.
२) ग्रीक नोंदीनुसार तो फक्त फेब्रु ते मार्च असा एक महिना तक्षशीलेत राहिला.
परंतु युध्द  झेलमकाठी जुलैमध्ये झाले. (इ.स.पू. ३२६)
३) कारी रणभूमी शंभर मैलांवर असताना त्यानं तक्षशीलेत ससैन्य पाच महिने वास्तव्य का केले. ग्रीकांना ठाऊक नाही.
४) परममित्र असलेला राजपुत्र अंभी युध्दाच्या अखेरीस देशद्रोही का झाला, कसा झाला ग्रीकांना ठाऊक नाही.
५) ग्रीकांना आर्य चाणक्य कोण होता कळलं नाही. त्याचा ग्रीक इतिहासात उल्लेख नाही.
६) आपल्या पाच महिन्यांच्या तक्षशीला वास्तव्यात त्याने तक्षशीला विद्यापीठाला एकदाही भेट

दिल्याची नोंद नाही.

७) ॲरिस्टॉटलने अलेक्झांडर शिकू शकणार नाही असं त्याचा पिता ि फलिप-२ रा याला स्पष्टपणे सांगितल्याची ग्रीक नोंद आहे. अनपढ, गवार, आपमतलबी, कपटी, खुनी असे त्याच्या व्यक्तिमत्वाचे ग्रीक इतिहासकारांनी केलेले वर्णन जर बरोबर असेल तर तो विद्वानांशी चर्चा करी अशा स्वरूपांच्या नोंदींना काही अर्थ नाही.

८) त्याची भारतात जी मानहानी झाली तेवढी जगातील कुठल्याही सम्राटाची अन्यत्र झाली नाही.

९) अठरा महिन्याच्या वास्तव्यात त्याचे तक्षशीलेतील वास्तव्य फेब्रुवारी-मार्च-एप्रिल-मे-जून म्हणजे पाच महिने राहिल्याचे आढळले आहे. हे पाच महिने त्याने ससैन्य आराम-मौज-मजा मदिरा मदिराक्षींच्या सहवासात फुकट घालवले.

१०) हा काळ पुरू, अभी, आर्य, चाणक्य, चंद्रगुप्त, मौर्य यांनी संघटीत होऊन त्याला कारी या अत्यंत अवघड पठाराकडे ऐन पावसाळ्यात खेचून आणले. ही जागा शिवाजी महाराजांच्या जावळीसारखी निबिड असावी. अफझलखानाला त्यांनी तिथे असेच खेचून मारले.

अशा कितीरी घटना माझ्या पुढील लेखनात आल्या आहेत. त्याची इथे पुनरूक्ती मी टाळतो. मला असं निश्चित म्हणावसं वाटतं-अलेक्झांडरचं शिक्षण झालं नसल्याने त्याला राजकारण शिष्टाचार याची ओळख नव्हती. हडेलहप्पी, दुराग्रही, क्रूरकर्मा एवढीच त्याची प्रतिमा खरी आहे. आर्य चाणाक्य पुरू राजपुत्र अंभी, चंद्रगुप्त मौर्य यापैकी कुठल्याही एका वा एकत्रित भारतीय सम्राटांची भूमिका मात्र सामंजस्याची व एकमेकांना समजून घेण्याचीच राहिली एवढं निश्चित. भूगोल, हवामान, प्रशासन या बाबतीत अलेक्झांडरच्या उणिवा स्पष्ट झाल्या आहेत. जनरल ॲबट, प्लूटार्च एरियन कर्टीस कनिंगहॅम, ब्रेलोर या लेखकांनी आपल्या संशोधनात केलेले युध्दप्रदेश व परिस्थितीचे वर्णन यातले साम्य अलेक्झांडरच्या उणिवा दाखवणारे आहे.

काळ, काम, वेग, प्रशासन या बाबतीत अलेक्झांडर पूर्णपणे कमी पडला. हे त्यावरून समजते. आयतं साम्राज्य, प्रचंड, सैन्य, संपत्ती, राज्यव्यवस्था, माणसांची पारख व त्यांचा उपयोग त्याला कुठेही करता आला नाही. पुरूने त्याला स्वतःच्या सरहद्दीवर व्यवस्थित अडकवले.

या घटनांचे चित्र इतक सुस्पष्ट असताना आमच्या पिढया स्वातंर्यि मिळून साठ वर्षे झाली तरी चुकीचा इतिहास शिकत आहेत.

अरूण निगुडकर
पत्ता : पितृ कृपा, १६ वा रस्ता, चेंबूर, मुंबई-४०००७१.
ई-मेल : arun.nigudkar@gmail.com

\- - -